असा. क्र. १६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, मे २, २००८/वैशाख १२, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | (२१५-२२५) |

दिनांक २९ एप्रिल २००८ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक २ मे २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६१ चा महा. २४. २००७ चा महा. अध्या. ७.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तत्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २९ ऑक्टोबर २००७ रोजी, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २००७ प्रख्यापित केला होता ;



[**किंमत :** रुपये १५.००]

**आणि ज्याअर्थी,** दिनांक १९ नोव्हेंबर २००७ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमामध्ये रुपांतर करण्यासाठी, दिनांक २२ नोव्हेंबर २००७ रोजी महाराष्ट्र विधानसभेत विधेयक मांडण्यात आले होते, परंतु ते राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आल्याकारणाने संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेश, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी जेव्हा समाप्त झाला असता त्या दिवशी, म्हणजे दिनांक ३० डिसेंबर २००७ रोजी अंमलात असण्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असणे चालू ठेवण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २८ डिसेंबर २००७ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) (पुढे चालू रहाणे) अध्यादेश, २००७ हा, प्रख्यापित केला होता ; सन २००७ चा महा. अध्या. ८

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) (पुढे चालू रहाणे) अध्यादेश, २००७ याचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— सन २००७ चा महा. अध्या. ८

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २९ ऑक्टोबर २००७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये, —— १९६१ चा महा २४.

(क) खंड (१०क दोन) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (१० क दोन-एक) " सहकारी पतसंरचना संस्था" याचा अर्थ, प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा राज्य सहकारी बँक, असा आहे ; " ;

(ख) खंड (१० क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (१० ख) " ठेवीदार " किंवा " वित्तीय सेवा उपभोक्ता " या संज्ञेचा अर्थ, जी व्यक्ती, प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्थेमध्ये, विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी, विवक्षित रक्कम ठेव म्हणून ठेवील ती व्यक्ती, असा आहे ; " ;

(ग) खंड (१९) मधील उप-खंड (क) मध्ये, " किंवा हितैषी सदस्य " या मजकुरानंतर, " आणि प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्थेतील कोणताही ठेवीदार किंवा वित्तीय सेवा उपभोक्ता " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(घ) खंड (१९) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (१९ क) " राष्ट्रीय बँक " याचा अर्थ, राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक अधिनियम, १९८१ याच्या तरतुदींअनुसार स्थापन करण्यात आलेली राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), असा आहे ; " . १९८१ चा ६१.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मधील पोट-कलम (१) मध्ये, पहिल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ६ ची सुधारणा.

" परंतु आणखी असे की, सदस्यांच्या, संस्थेच्या कार्यक्षेत्रातील निवासाबाबतची शर्त, सहकारी पतसंरचना संस्था असलेल्या संस्थेच्या नोंदणीस लागू असणार नाही. " .

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मधील पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १३ ची सुधारणा.

" परंतु असे की, एखाद्या सहकारी पतसंरचना संस्थेने उपविधीत केलेल्या सुधारणेची नोंदणी करण्यासाठी केलेला अर्ज, तो मिळाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत निबंधक निकालात काढील.".

५. मुख्य अधिनियमाच्या कलम २१क मधील, पोट-कलम (१) मध्ये, " साध्य होत नसतील " या मजकुरानंतर, ' किंवा जी प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्था, " बँक " , " बँकव्यवसाय ", " बँक व्यवसायी " हे शब्द किंवा तिच्या नावामधील " बँक " या शब्दाचे अन्य कोणतेही साधित शब्द यांचा वापर करीत असेल ' हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २१क ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम २२ मधील, पोट-कलम (१) मध्ये, खंड (च) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २२ ची सुधारणा.

" (छ) ठेवीदार किंवा वित्तीय सेवा उपभोक्ता ; " .

**७. मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये, पोट-कलम (११) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—** सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २७ ची सुधारणा.

" (१२) प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्थेच्या बाबतीत, तिच्या ठेवीदारास किंवा वित्तीय सेवा उपभोक्त्यास मत देण्याचा हक्क असेल :

परंतु असे की, संबंधित कागदपत्रात, संयुक्त ठेवीदारांपैकी किंवा संयुक्त वित्तीय सेवा उपभोक्त्यांपैकी ज्याचे नाव प्रथम असेल त्याला मत देण्याचा हक्क असेल आणि त्याच्या अनुपस्थितीत ज्याचे नाव दुसरे असेल त्याला आणि त्या दोघांच्याही अनुपस्थितीत त्यांच्यानंतर ज्याचे नाव असेल त्याला मत देण्याचा हक्क असेल :

परंतु असेही की, वैयक्तिक ठेवीदारांनी किंवा वित्तीय सेवा उपभोक्त्यांनी ठेव ठेवल्याच्या किंवा वित्तीय सेवांचा उपभोग घेण्याच्या दिनांकापासून दोन वर्षे पूर्ण केलेली नसतील तर अशा कोणत्याही व्यक्तीस मत देण्याचा हक्क असणार नाही; आणि वैयक्तिक ठेवीदाराव्यतिरिक्त अन्य ठेवीदारास किंवा वित्तीय सेवा उपभोक्त्यास प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्थेच्या कामकाजामध्ये मत देण्याचा हक्क राहील ; मात्र त्यासाठी त्यांना, ठेव ठेवण्यात आल्याच्या किंवा वित्तीय सेवांचा उपभोग घेण्याच्या दिनांकापासून तीन वर्षे पूर्ण करणे आवश्यक असेल." .

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ४३ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु असे की, सहकारी पतसंरचना संस्था, ठेवींवरील व कर्जांवरील व्याजदराच्या बाबतीत भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी अनुरुप अशा, तिच्या स्वतःच्या धोरणांचा अंगीकार करील.";

(ख) पोट-कलम (२) मधील, पहिल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, या पोट-कलमातील काहीही सहकारी पतसंरचना संस्थांना लागू असणार नाही. तथापि, अशा संस्थेला भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी अनुरूप अशा तिच्या स्वतःच्या धोरणाचा अंगीकार करता येईल." ;

(ग) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (३) पोट-कलमे (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि भारतीय रिझर्व बँकेने व राष्ट्रीय बँकेने वेळोवेळी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना अधीन राहून, सहकारी पतसंरचना संस्थेला,—

(क) संस्था व तिचे सदस्य यांचे हित लक्षात घेऊन, भारतीय रिझर्व बँकेने विनियमित केलेल्या कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेता येईल ;

(ख) ठेवींवरील व कर्जावरील व्याजाचा दर ठरविता येईल ;आणि

(ग) कर्जाविषयक धोरणे निश्चित करता येतील व वैयक्तिक कर्जाशी संबंधित प्रश्नांच्या बाबतीत निर्णय घेता येईल." .

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ मध्ये, पहिल्या परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, या पोट-कलमातील काहीही, सहकारी पतसंरचना संस्थांनी तयार केलेल्या कर्ज देण्याच्या धोरणाला लागू असणार नाही. तथापि, अशी संस्था, भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी अनुरूप अशा तिच्या स्वतःच्या धोरणाचा अंगीकार करील." .

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ५० ची सुधारणा.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम ५० मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु असे की, सहकारी पतसंरचना संस्थेच्या बाबतीत, राज्य शासन, तिच्या एकूण भागभांडवलाच्या २५% हून अधिक भागभांडवल धारण करणार नाही आणि संस्थेला, शासनाने अंशदान केलेले भागभांडवल आणखी कमी करण्याचा पर्याय उपलब्ध असेल ." .

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

" परंतु असे की, प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्था, राष्ट्रीय बँकेने विनिर्दिष्ट केलेल्या निकषांना अनुसरून निबंधकाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तिच्या सदस्यांना लाभांश देईल." .

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६८ च्या पोट-कलम (१) मध्ये, " प्रत्येक संस्था " या मजकुराऐवजी, " सहकारी पतसंरचना संस्था नसणारी प्रत्येक संस्था " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ६८ ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६९ क ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामध्ये कलम ६९ क समाविष्ट करणे.

" **६९ क.** (१) प्राथमिक कृषि पत संस्था, बहुउद्देशीय सहकारी संस्था व सेवा सहकारी संस्था व याबाबतीत विहित करण्यात येतील अशा संस्थांच्या इतर वर्गाच्या (या कलमात यापुढे ज्यांचा "सहकारी राज्य संवर्ग" असा निर्देश करण्यात आला आहे) सचिवाचा एक सहकारी राज्य संवर्ग प्रस्थापित करण्यात येईल. त्यात राज्य शासनाकडून याबाबतीत अधिसूचित करण्यात आलेल्या मध्यवर्ती संस्थांकडून या प्रयोजनासाठी भरती करण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश असेल. भरती करावयाच्या व्यक्तींची संख्या व त्यांच्या सेवेच्या शर्ती राज्य शासनाकडून याबाबतीत वेळोवेळी देण्यात आलेली सर्वसाधारण व विशेष मार्गदर्शक तत्त्वे, कोणतीही असल्यास, त्यानुसार मध्यवर्ती संस्थेकडून निश्चित केल्या जातील. विवक्षित संस्थांच्या सचिवांचा सहकारी राज्य संवर्ग प्रस्थापित करणे व अशा संवर्गासाठी सेवायोजन निधी स्थापन करणे.

(२) मध्यवर्ती संस्थेस तिने त्या संवर्गात नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे वेळोवेळी पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही संस्थेकडे प्रतिनियुक्तीवर पाठविता येईल. अशा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही संस्थेच्या अधीन काम करण्यासाठी नेमण्यात आले असेल त्याबाबतीत मध्यवर्ती संस्था निश्चित करील अशा मुदतीसाठी व अशा अटींवर व शर्तीवर त्या पदावरील सेवा त्या संस्थेकडून स्वतःकडे घेण्यात येतील. परंतु, अशी नेमलेली व्यक्ती पोट-कलम (३) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या निधीमधून आपला पगार व भत्ते घेईल.

(२क) संवर्गात नियुक्त करण्यात आलेल्या आणि पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या प्रत्येक संस्थेच्या नियंत्रणाखाली सचिव म्हणून काम करण्यासाठी प्रतिनियुक्त केलेल्या किंवा पदस्थापित करण्यात आलेल्या

व्यक्तिसंबंधातील लगत प्रारंभिक पर्यवेक्षी नियंत्रणाचे काम अशा व्यक्तींना ज्या संस्थांचे सदस्य म्हणून प्रतिनियुक्त करण्यात आलेले असेल, अशा प्रत्येक संबंधित तालुक्यातील संस्थांच्या समावेश असलेल्या व त्या प्रयोजनासाठी नोंदणी करण्यात आलेल्या तालुका पर्यवेक्षण संस्थेकडे असेल. तालुका पर्यवेक्षण संस्था, अशा संस्थेच्या उपविधींद्वारे तिच्याकडे प्रदान करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि तिच्याकडे सोपविण्यात येतील अशी कामे किंवा कर्तव्ये पार पाडील.

(३) राज्य शासनाकडून याबाबतीत अधिसूचित करण्यात आलेली शिखर संस्था "सहकारी राज्य संवर्ग सेवायोजन निधी" या नावाचा एक निधी स्थापन करील. असा निधी स्थापन झाल्यावर तो १ जुलै १९७३ पासून स्थापन झाला असल्याचे मानण्यात येईल. या निधीचा विनियोग, सहकारी राज्य संवर्गात नेमण्यात आलेल्या व्यक्तींना द्यावयाचे वेतन, भत्ते व इतर वित्तलब्धी यांवरील खर्च व त्या संवर्गाशी संबधित इतर खर्च भागविण्यासाठी करण्यात येईल.

(४) या बाबतीत राज्य शासनाकडून वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करण्यात आलेली,—

(क) राज्य शासनाच्या मते सहकारी सचिव राज्य संवर्गातील कोणत्याही सचिवाच्या सेवांपासून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही लाभ घेणारी प्रत्येक संस्था किंवा संस्थांचा वर्ग किंवा संस्थांचे वर्ग आणि—

(ख) राज्य शासनाच्या मते उपरोक्तपणे असा लाभ घेणारा कोणताही व्यवसाय, धंदा किंवा उद्योग चालविणारा इतर प्रत्येक निगम निकाय किंवा अशा निगम निकायाचा वर्ग किंवा अशा निगम निकायांचे वर्ग,

१ जुलै १९७७ पासून, विहित करण्यात येईल अशा दराने व अशा रीतीने उक्त निधीस दरवर्षी अंशदान देतील आणि निरनिराळ्या संस्था किंवा इतर निगम निकाय किंवा संस्थेचा वर्ग किंवा संस्थांचे वर्ग किंवा इतर निगम निकायाचा वर्ग किंवा इतर निगम निकायांचे वर्ग यासाठी निरनिराळे दर विहित करता येतील. अंशदानाचा दर किंवा अंशदानाचे दर निश्चित करताना राज्य शासन पोट-कलम (३) मध्ये निर्देशिलेला खर्च द्यावा लागेल अशी संभाव्य सेवा आणि संबंधित संस्था किंवा इतर निकाय यांची आर्थिक स्थिती विचारांत घेईल.

**स्पष्टीकरण.—** संस्था त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्यास हे कलम लागू आहे अशा कोणत्याही इतर निगम निकायांकडून उक्त निधीत देण्यात येणाऱ्या अंशदानाच्या आकारणीच्या व वसुलीच्या प्रयोजनासाठी असा निगम निकाय हा, अधिनियम लागू असणारी संस्था म्हणून मानता येईल.

(५) लगतपूर्ववर्ती पोट-कलमांच्या आवश्यकतांचे पालन करण्यात कसूर झाल्यास, निबंधकास संबंधित संस्थेवर मागणीच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत अंशदान देण्याबद्दल मागणीची नोटीस बजावता येईल. अशी मागणी ही, संस्थेच्या उत्पन्नावर भार असेल. उक्त मुदतीत अंशदान देण्यात आले नाही तर निबंधकास संस्थेचे निधी जिच्या अभिरक्षेत असतील, अशा बँकेस किंवा व्यक्तीस अंशदानाची रक्कम ताबडतोब देण्याचा निदेश देता येईल आणि अशी बँक किंवा व्यक्ती निबंधकाच्या आदेशाचे पालन करील. अशा निदेशानुसार केलेल्या प्रत्येक प्रदानाने बँकेच्या किंवा व्यक्तीच्या

अभिरक्षेत असलेल्या संस्थेच्या पैशांतून तिने अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही रकमेच्या संबंधात तिच्यावर असलेल्या संस्थेच्या सर्व दायित्वातून तिची पुरेशा रीतीने मुक्तता होईल.

(६) उक्त निधीची अभिरक्षा, त्याचे परिरक्षण, त्यात पैसे भरणे, त्यातून पैसे काढणे व खर्च करणे या बाबींशी संबंधित किंवा त्यांना सहाय्यभूत होणाऱ्या सर्व बाबींचे नियमन करण्यासाठी राज्य शासनास नियम करता येतील.

(७) पोट-कलमे (१) ते (६) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दिनांक १ जानेवारी २००९ रोजी व तेव्हापासून पोट-कलमे (१) ते (६) यातील कोणतीही गोष्ट सहकारी पतसंरचना संस्थेला लागू होणार नाही.".

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६९ क नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यात कलम ६९ ख समाविष्ट करणे.

जिल्हा स्तरीय समित्या व राज्य स्तरीय समिती घटित करणे.

" **६९ ख.** राज्य शासन, राज्यातील गट सचिवांच्या समस्या सोडविण्यासाठी त्याला योग्य वाटतील अशा, जिल्हास्तरीय समित्या व राज्यस्तरीय समिती घटित करील." .

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७० ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७०ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

निधीची गुंतवणूक.

" **७०.** सहकारी पतसंरचना संस्थेखेरीज इतर प्रत्येक संस्था, आपला निधी, पुढीलपैकी एका किंवा अनेक ठिकाणी गुंतवील किंवा ठेव म्हणून ठेवील :—

(क) मध्यवर्ती बँक किंवा राज्य सहकारी बँक ;

१८८२ चा २. (ख) भारतीय विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १८८२ याच्या कलम २० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रोख्यांपैकी कोणतीही रोखा ;

(ग) मर्यादित दायित्व असलेल्या व तिच्याप्रमाणे त्याच वर्गीकरणात मोडणाऱ्या अन्य कोणत्याही संस्थेने काढलेले शेअर्स किंवा प्रतिभूति बंधपत्रे किंवा ऋणपत्रे :

परंतु असे की, कोणतीही संस्था, तिच्याकडे भरणा झालेल्या भागभांडवलाची, विहित करण्यात येईल अशा प्रमाणापेक्षा अधिक गुंतवणूक करणार नाही :

परंतु आणखी असे की, सहकारी पतसंरचना संस्था, भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना अधीन राहून, तिचा निधी गुंतवील." .

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७२ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यात कलम ७२ क समाविष्ट करणे.

निवड केलेल्या संघीय संरचनेशी संलग्न किंवा असंलग्न होण्याचे स्वातंत्र्य.

" **७२ क.** या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, सहकारी पतसंरचना संस्थांना, त्यांच्या निवडीनुसार कोणत्याही संघीय संरचनेशी संलग्न किंवा असंलग्न होण्याचे स्वातंत्र्य असेल :

परंतु असे की, सहकारी पतसंरचना संस्थेच्या सर्वसाधारण सभेत, अशा संस्थेच्या एकूण सदस्यांपैकी तीन चतुर्थांश सदस्यांनी बहुमताने या प्रयोजनार्थ ठराव संमत करणे आवश्यक आहे . " .

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यात कलम ७३ ङ क समाविष्ट करणे.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ ङ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या किंवा राज्य सहकारी बँकेचा संचालक असण्यासाठी निरर्हता.

" **७३ ङक.** समितीचा सदस्य असण्याच्या निरर्हतेसंबंधातील या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींना बाध न आणता, जर एखादी व्यक्ती,—

(एक) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या किंवा राज्य सहकारी बँकेच्या मंडळावर प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्थेखेरीज अन्य संस्थेचे प्रतिनिधित्व करीत असेल आणि अशा संस्थेने अशा बँकेस नव्वद दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी देणी चुकती करण्यात कसूर केलेली असेल ;

(दोन) प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्थेची कसूरदार असेल किंवा कसूरदार प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्थेची पदाधिकारी असेल ;

(तीन) ज्या संस्थेची व्यवस्थापन समिती बरखास्त करण्यात आली असेल अशा संस्थेचे प्रतिनिधित्व करीत असेल ;

तर, अशी कोणतीही व्यक्ती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा किंवा राज्य सहकारी बँकेचा संचालक म्हणून नियुक्त केली जाण्यास, नामनिर्देशित केली जाण्यास, स्वीकृत केली जाण्यास, किंवा संचालक होण्यास पात्र असणार नाही.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३ छ ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३छ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(४) (क) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आणि राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर भारतीय रिझर्व बँकेने किंवा राष्ट्रीय बँकेने विहित केलेली अर्हता धारण करणारे दोन व्यावसायिक असतील.

(ख) निबंधक, त्या बँकेला, त्याने निदेशात नमूद केलेल्या कालमर्यादेच्या आत अशा व्यावसायिकांना अशा संचालक मंडळावर स्वीकृत करण्याचा निदेश देईल, जर बँकेने पूर्वोक्त निदेशांचे अनुपालन करण्यात कसूर केली तर निबंधक स्वतः अशा व्यावसायिक संचालकांची नियुक्ती करील आणि अशी नियुक्ती उक्त बँकेवर बंधनकारक असेल. व्यावसायिक संचालकास मतदानाच्या अधिकारासह सर्व अधिकार असतील.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३ ज ची सुधारणा.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ ज मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु असे की, सहकारी पतसंरचना संस्थेच्या बाबतीत निबंधक किंवा प्रशासक, त्या संस्थेच्या व्यवस्थापनाचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालावधीच्या आत निवडणूक घेईल. ".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७४ ची सुधारणा.

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७४ मधील पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु असे की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य सहकारी बँक यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या नियुक्तीसाठीची अर्हता. भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे असेल. ".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७७क ची सुधारणा.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७७ क मध्ये, पोट-कलम (३) मधील परंतुकाऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

"परंतु असे की, अशा प्रकारे नियुक्त करण्यात आलेली समिती किंवा प्रशासक हा, संस्थेचे व्यवस्थापन हाती घेतल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत सहकारी पतसंरचना संस्थेची नवीन समिती घटित करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करील :

परंतु आणखी असे की, समितीचा किंवा प्रशासकाचा पदावधी पूर्ण झाल्यानंतर किंवा समाप्त झाल्यानंतर जर समिती घटित झाली नाही किंवा घटित होऊ शकली नाही तर, समितीचा किंवा यथास्थिती, प्रशासकाचा पदावधी, जोपर्यंत नवीन समिती यथोचितरित्या घटित होत नाही तोपर्यंत वाढविण्यात आल्याचे मानण्यात येईल :

परंतु आणखी असे की, कोणत्याही परिस्थितीत, सहकारी पतसंरचना संस्थेच्या समितीचा किंवा प्रशासकाचा, वाढविण्यात आलेला हा कालावधी त्या समितीची मुदत समाप्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७८ ची सुधारणा.

**२२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७८ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये शेवटी, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

" परंतु आणखी असे की, भारतीय रिझर्व बँकेशी अगोदर विचारविनिमय केल्याशिवाय या पोट-कलमान्वये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची किंवा राज्य सहकारी बँकेची समिती बरखास्त करण्यात येणार नाही किंवा ती दूर करण्यात येणार नाही :

परंतु असेही की, निबंधकाला, पुढील परिस्थिती असल्याखेरीज, प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्थेची समिती बरखास्त करता येणार नाही :—

(एक) संस्थेला लागोपाठच्या तीन वर्षांमध्ये तोटा झालेला असेल; किंवा

(दोन) गंभीर वित्तीय नियमबाह्य बाबी किंवा अफरातफरी उघडकीस आल्या असतील ; किंवा

(तीन) अशा आशयाचे न्यायीक निदेश देण्यात आलेले असतील ; किंवा

(चार) सतत गणपूर्ती होत नसेल :

परंतु असेही की, बरखास्त झालेल्या प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्थेच्या मंडळाचे सदस्य हे, मंडळ बरखास्त झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी समितीचे सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यासाठी, पुन्हा नियुक्त होण्यासाठी, पुन्हा नामनिर्देशित होण्यासाठी किंवा पुन्हा स्वीकृत केले जाण्यासाठी पात्र असणार नाहीत . " ;

(ख) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) विद्यमान परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु असे की, समिती किंवा प्रशासक सहकारी पतसंरचना संस्थेच्या मंडळाच्या बरखास्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालावधीच्या आत, सहकारी पतसंरचना संस्थेची नवीन समिती घटित करण्याची व्यवस्था करील ; ".

(दोन) विद्यमान परंतुकात, " परंतु असे की ", या मजकुराऐवजी, " परंतु आणखी असे की " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) विद्यमान परंतुकानंतर, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, कोणत्याही परिस्थितीत सहकारी पत संरचना संस्थेच्या समितीचा किंवा प्रशासकाचा, वाढविण्यात आलेला हा कालावधी, ती समिती बरखास्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. " .

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ८१ ची सुधारणा.

**२३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८१ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१) मध्ये,—

(क) उप-खंड (क) नंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु असे की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य सहकारी बँक यांची लेखापरीक्षा, राष्ट्रीय बँकेने मान्यता दिलेल्या सनदी लेखापालाकडून करण्यात येईल. " ;

(ख) उप-खंड (ख) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्था, प्रत्येक सहकारी वर्षात निदान एकादा तरी, निबंधकाने ठेवलेल्या लेखापरीक्षक नामिकेतील लेखापरीक्षकाद्वारे ; किंवा भारतीय सनदी लेखपाल संस्थेने दिलेले सहकारी संस्था लेखापरीक्षा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या एखाद्या सनदी लेखापालाद्वारे आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य सहकारी बँक, प्रत्येक सहकारी वर्षात निदान एकदा तरी, राष्ट्रीय बँकेने मान्यता दिलेल्या लेखापरीक्षकांच्या नामिकेतील एखाद्या सनदी लेखापालाकडून आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील . " ;

(दोन) पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (७) भारतीय रिझर्व बँकेने सहकारी बँकेची विशेष लेखापरीक्षा करण्यास सांगितले तर तिची तशी विशेष लेखापरीक्षा करण्यात येईल आणि त्याबाबतचा अहवाल आणि विशेष लेखापरीक्षा अहवाल याबाबत निबंधकाला कळवून ते अहवाल भारतीय रिझर्व बँकेकडे सादर करण्यात येतील. ".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ११० क ची सुधारणा.

**२४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११०क ला पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ; आणि अशा नव्याने क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य सहकारी बँक यांच्या बाबतीत भारतीय रिझर्व बँकेने सल्ला दिल्याप्रमाणे, निबंधक, एक महिन्याच्या आत, मंडळ बरखास्त करील आणि परिसमापकाची नेमणूक करील. ".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १५७ ची सुधारणा.

**२५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५७ मध्ये, " संस्थांच्या वर्गास " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्या मजकुरानंतर " सहकारी पतसंरचना संस्थेव्यतिरिक्त, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**२६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६५ मध्ये, पोट-कलम (२) मधील खंड (बत्तीस-क) वगळण्यात येईल. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १६५ ची सुधारणा.

सन २००७ चा महा. अध्या. ८. **२७.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) (पुढे चालू राहणे) अध्यादेश, २००७ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ३३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, मे २, २००८/वैशाख १२, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Act, 2008 (Mah. XI of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XI OF 2008.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 2nd May 2008).*

An Act further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra Co-operative Societies (Second Amendment) Ordinance, 2007, on the 29th October 2007 ;

Mah. XXIV of 1961. Mah. Ord. VII of 2007.

AND WHEREAS upon the re-assembly of the State Legislature on the 19th November 2007, a Bill for converting the said Ordinance into an Act of the State Legislature was introduced in

the Maharashtra Legislative Assembly on the 22nd November 2007, but it could not be passed as the same came to be referred to the Joint Committee of both Houses of the State Legislature ;

AND WHEREAS the said Ordinance would have ceased to operate after 30th day of December 2007, on which date the period of six weeks from the date of re-assembly of the State Legislature was to expire ;

AND WHEREAS both houses of the State Legislature were not in session and the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to continue the provisions of the said Ordinance promulgated the Maharashtra Co-operative Societies (Second Amendment) (Continuance) Ordinance, 2007 on the 28th December 2007 ; Mah. Ord. VIII of 2007.

AND WHEREAS it is expedient to replace the Maharashtra Co-operative Societies (Second Amendment) (Continuance) Ordinance, 2007, by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :— Mah. Ord. VIII of 2007.

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Act, 2008.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 29th October 2007.

Amendment of section 2 of Mah. XXIV of 1961.

**2.** In section 2 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 (hereinafter referred to as " the principal Act "),— Mah. XXIV of 1961.

(*a*) after clause (*10-aii*), the following clause shall be inserted, namely :—

" (*10-aii-l*) " co-operative credit structure entity " means the primary agricultural credit co-operative society, the District Central Co-operative Bank or the State Co-operative Bank ; " ;

(*b*) after clause (*10-A*), the following clause shall be inserted, namely :—

" (*10-B*) " depositor " or " financial service user " means a person who deposits certain amount in primary agriculutral co-operative credit society for such period as may be prescribed ; " ;

(*c*) in clause (*19*), in sub-clause (*a*), the following words shall be added at the end, namely :—

" and any depositor or financial service user of primary agricultural co-operative credit society " ;

(*d*) after clause (*19*), the following clause shall be inserted, namely :—

" (*19A*) " National Bank " means the National Bank for Agriculture and Rural Development (NABARD), constituted under the provisions of the National Bank for Agriculture and Rural Development Act, 1981 ; " 61 of 1981.

3. In section 6 of the principal Act, in sub-section (*1*), after the first proviso, the following proviso shall be added, namely :— Amendment of section 6 of Mah. XXIV of 1961.

" Provided further that, the condition regarding residence of the members in the area of operation of the society shall not apply for registration of the society, being the co-operative credit structure entity. ".

4. In section 13 of the principal Act, to sub-section (*1*), the following proviso shall be added, namely :— Amendment of section 13 of Mah. XXIV of 1961.

" Provided that, the application for registration of the amendment of by-laws of the co-operative credit structure entity shall be disposed of, by the Registrar within a period of one month from the date of its receipt. ".

5. In section 21A of the principal Act, in sub-section (*1*), after the word " served " the following words shall be inserted, namely :— Amendment of section 21A of Mah. XXIV of 1961.

" or any primary agricultural co-operative credit society using the word 'Bank', 'Banking', 'Banker' or any other derivative of the word 'Bank' in its name.".

6. In section 22 of the principal Act, in sub-section (*1*), after clause (*f*), the following clause shall be inserted, namely :— Amendment of section 22 of Mah. XXIV of 1961.

" (*g*) the depositor or the financial service user :".

7. In section 27 of the principal Act, after sub-section (*11*), the following sub-section shall be added, namely:— Amendment of section 27 of Mah. XXIV of 1961.

" (*12*) In the case of a primary agricultural credit co-operative society, the depositor or financial service user shall have right to vote :

Provided that, out of joint depositors, joint financial service users whose name stands first in the relevant documents shall have the right to vote and in his absence whose name stands second and in the absence of both, the next shall have the right to vote :

Provided also that, unless two years by an individual depositors or financial service users are completed from the date of deposit or financial service use, no such person shall have right to vote ; and, the depositor or the financial service user, other than an individual, shall have right to vote in the affairs of a primary agricultural credit co-operative society, provided they complete three years from the date of deposit or financial service use.".

Amendment of section 43 of Mah. XXIV of 1961.

8. In section 43 of the principal Act,—

(*a*) to sub-section (*1*), the following proviso shall be added, namely :—

" Provided that, the co-operative credit structure entity shall adopt its own policies regarding interest rates on deposits and loans in conformity with the Reserve Bank of India guidelines. " ;

(*b*) in sub-section (*2*), after the first proviso, the following proviso shall be added, namely:—

"Provided further that, nothing in this sub-section shall apply to the co-operative credit structure entity. However, such entity may adopt its own policy in conformity with the Reserve Bank of India guidelines.";

(*c*) after sub-section *(2)*, the following sub-section shall be added, namely :—

" (*3*) Notwithstanding anything contained in sub-sections (*1*) and (*2*), and subject to the guidelines issued by the Reserve Bank of India and the National Bank, from time to time, a co-operative credit structure entity may,—

(*a*) borrow from any financial institution regulated by the Reserve Bank of India, keeping in view the interest of the society and its members ;

(*b*) decide interest rates on deposits and loans ; and

(*c*) decide loan policies and issues relating to individual loans.".

Amendment of section 44 of Mah. XXIV of 1961.

9. In section 44 of the principal Act, after the first proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided further that, nothing in this section shall apply to the loan making policy made by the co-operative credit structure entity. However, such entity shall adopt its own policy in conformity with the Reserve Bank of India guidelines. ".

Amendment of section 50 of Mah. XXIV of 1961.

10. To section 50 of the principal Act, the following proviso shall be added, namely :—

" Provided that, in the case of the co-operative credit structure entity, the State Government shall not hold more than 25% of the total share capital and the entity shall have option to further reduce the share capital contributed by the Government. ".

11. To section 67 of the principal Act, the following proviso shall be added, namely :— *Amendment of section 67 of Mah. XXIV of 1961.*

" Provided that, the primary agricultural credit co-operative society shall pay dividend to its members as per the guidelines issued by the Registrar, in accordance with criteria specified by the National Bank. ".

12. In section 68 of the principal Act, in sub-section (*1*), for the words " Every society " the words " Every society not being co-operative credit structure entity " shall be substituted. *Amendment of section 68 of Mah. XXIV of 1961.*

13. For section 69A of the principal Act, the following section shall be substituted, namely :— *Substitution of section 69A in Mah. XXIV of 1961.*

" **69A.** (*1*) There shall be constituted a Co-operative State Cadre of Secretaries of primary agricultural credit societies, multi-purpose co-operative societies and service co-operatives and such other classes of societies as may be prescribed in this behalf (hereinafter in this section referred to as " the Co-operative State Cadre ") consisting of persons recruited for this purpose by the Central Societies notified in this behalf by the State Government. The number of persons to be recruited and their conditions of service shall be determined by the Central Societies in accordance with such general or special guidelines, if any, as may be issued by the State Government, from time to time. *Constitution of Co-operative State Cadre of Secretaries of certain societies and establishment of Employment Fund for such Cadre.*

(*2*) A Central Society may, from time to time, depute any person appointed by it to that cadre to work under any society referred to in sub-section (*1*), as it may consider necessary. Where any such person is posted to work under any society, his services shall be taken over by the society on such post, for such period and on such other terms and conditions, as the Central Society may determine, but the person so posted shall draw his salary and allowances from the Fund established under sub-section (*3*).

(*2A*) The immediate initial supervisory control on the person appointed to the cadre and deputed or posted to work as secretary under each of the societies referred to in sub-section (*1*) shall be with the Taluka Supervision Society consisting of the societies, in each respective Taluka to which such persons are deputed, as members thereof and registered for the purpose. The Taluka Supervision Society shall, exercise such powers and discharge such functions or perform such duties as may be conferred or imposed on it by the bye-laws of such society.

(*3*) An Apex society notified in this behalf by the State Government shall establish a Fund to be called " the Co-operative State Cadre Employment Fund ", which, when established, shall

be deemed to have been established with effect from the 1st day of July 1973. It shall be utilized for meeting the expenses on the salaries, allowances and other emoluments to be paid to the persons appointed to the Co-operative State Cadre and the other expenditure relating to the Cadre.

(*4*) (*a*) Every society or class or classes of societies, which in the opinion of the State Government, derive any benefit, directly or indirectly, from the services of any Secretary belonging to the Co-operative State Cadre of Secretaries, and

(*b*) Every other body corporate carrying on any trade, business or industry or class or classes of such corporate bodies, which in the opinion of the State Government, derives such benefit as aforesaid, and which are notified by the State Government in this behalf, from time to time, by general or special order, shall, with effect from the first day of July 1977, contribute annually to the said Fund, at such rate and in such manner as may be prescribed, and different rates may be prescribed for different societies or other corporate bodies or class or classes of societies or class or classes of other corporate bodies. In determining the rate or rates of contribution, the State Government shall take into consideration the expenditure referred to in sub-section (*3*), the services likely to be rendered and the financial condition of the societies or other bodies concerned.

*Explanation.*—Notwithstanding anything contained in any law for the time being in force, for the purposes of levy and collection of the contribution to the said Fund by any other corporate body to which this section applies, such corporate body shall be deemed to be a society governed by this Act.

(*5*) Where there is a failure to comply with the requirements of the last preceding sub-section, the Registrar may serve a demand notice on the society concerned to pay the contribution within two months from the date of demand. Such demand shall be a charge on the income of the society. If the contribution is not paid within the period aforesaid, the Registrar may direct any Bank or person having custody of the Funds of the society to pay the amount of the contribution immediately, and such Bank or person shall comply with the orders of the Registrar. Every payment made pursuant to such direction shall be a sufficient discharge to such Bank or person from all liability to the society in respect of any sum so paid by it or him out of the moneys of the society in his custody.

(*6*) The State Government may make rules regulating all matters connected with or ancillary to the custody and maintenance of, the payment of moneys into, and the expenditure and withdrawal of moneys from, the said Fund.

(7) Notwithstanding anything contained in sub-sections (*1*) to (*6*), on and from the 1st day of January 2009, nothing in sub-sections (*1*) to (*6*) shall apply to a co-operative credit structure entity. ".

Insertion of section 69B in Mah. XXIV of 1961.

**14.** After section 69A of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Constitution of District level and State Level Committees.

" **69B.** The State Government shall constitute District Level Committees and the State Level Committee, from time to time, as it shall deem fit, for solving the problems of Group Secretaries in the State. ".

Substitution of section 70 of Mah. XXIV of 1961.

**15.** For section 70 of the principal Act, the following section shall be substituted, namely :—

Investment of funds.

" **70.** Every society other than the co-operative credit structure entity shall invest or deposit its funds in one or more of the following :—

(*a*) in a Central Bank, or the State Co-operative Bank ;

II of 1882.

(*b*) in any of the securities specified in section 20 of the Indian Trusts Act, 1882 ;

(*c*) in the shares, or security bonds, or debentures, issued by any other society with limited liability and having the same classification to which it belongs :

Provided that, no society shall invest more than such proportion of it's paid up share capital as may be prescribed :

Provided further that, the co-operative credit structure entity shall invest its funds subject to guidelines as may be issued, from time to time, by the Reserve Bank of India. ".

Insertion of section 72A in Mah. XXIV of 1961.

**16.** After section 72 of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Freedom of affiliation or disaffiliation with a federal structure of choice.

" **72A.** Notwithstanding anything contained in this Act or any other law for the time being in force, the co-operative credit structure entity shall have the liberty for the affiliation or disaffiliation with the federal structure of its choice :

Provided that, in the general meeting of the co-operative credit structure entity, a resolution for this purpose is passed by a majority of not less than 3/4th of the total members of such entity. ".

Insertion of section 73-EA in Mah. XXIV of 1961.

**17.** After section 73-E of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Disqualification for being director of District Central Co-operative Bank or State Co-operative Bank.

" **73-EA.** Without prejudice to the other provisions of this Act or the rules made thereunder, in relation to the disqualification of being a member of a committee, no person shall be eligible for being appointed, nominated, co-opted or, for being a director of a District Central Co-operative Bank or of the State Co-operative Bank, if he,—

(*i*) is a person who represents a society other than a primary agricultural credit co-operative society on the board of a District Central Co-operative Bank or State Co-operative Bank, if the society to whom he represents has committed a default towards the payments of such Bank for a period exceeding ninety days ;

(*ii*) is a person who is defaulter of a primary agricultural credit co-operative society or is an office bearer of a defaulting primary agricultural co-operative credit society ;

(*iii*) is a person, who represents a society whose Managing Committee is superseded. ".

Amendment of section 73-G of Mah. XXIV of 1961.

**18.** In section 73-G of the principal Act, after sub-section (*3*), the following sub-section shall be inserted, namely :—

"(*4*) (*a*) There shall be two professionals on the board of directors of District Central Co-operative Bank and State Co-operative Bank having qualifications prescribed by the Reserve Bank of India or the National Bank.

(*b*) The Registrar shall direct the bank concerned to co-opt such professionals on the board of directors within the time limit specified in the direction by the Registrar. If the bank fails to comply with the aforesaid directions, the Registrar himself shall appoint such professional directors and such appointment shall be binding on the said bank. The professional director shall have all the rights inclusive of voting right. ".

Amendment of section 73-H of Mah. XXIV of 1961.

**19.** In section 73-H of the principal Act, after sub-section (*2*), the following proviso shall be added, namely :—

" Provided that, in the case of co-operative credit structure entity, the Registrar or Administrator shall hold election within a period of two months from the date of taking over the management of the society. ".

**20.** In section 74 of the principal Act, to sub-section (*2*), the following proviso shall be added, namely :— Amendment of section 74 of Mah. XXIV of 1961.

" Provided that, the qualification for appointment of the Chief Executive Officer of the District Central Co-operative Bank and the State Co-operative Bank shall be such as may be prescribed by the Reserve Bank of India, from time to time. ".

**21.** In section 77A of the principal Act, in sub-section (*3*), for the proviso, the following provisos shall be substituted, namely :— Amendment of section 77A of Mah. XXIV of 1961.

Provided that, a committee or Administrator so appointed shall make necessary arrangements for constituting a new committee of the co-operative credit structure entity within two months from the date of assuming the management of the society :

Provided further that, if a committee is not, or cannot be, constituted at the expiry or determination of the term of office of the committee or the Administrator, the term of office of the committee or the Administrator, as the case may be, shall be deemed to be extended until the new committee is duly constituted :

Provided also that, in no circumstances the term of office of the committee of, or the Administrator appointed on, the co-operative credit structure entity shall exceed six months from the date of expiry of the term of its committee.

**22.** In section 78 of the principal Act,— Amendment of section 78 of Mah. XXIV of 1961.

(*a*) in sub-section (*1*), the following provisos shall be added at the end, namely :—

" Provided further that, the supersession or removal of the committee of the District Central Co-operative Bank or the State Co-operative Bank under this sub-section shall not be done without prior consultation with the Reserve Bank of India :

Provided also that, the committee of a primary agricultural co-operative credit society shall not be superseded by the Registrar, except under the following circumstances, namely :—

(*i*) if a society incurs losses for three consecutive years ; or

(*ii*) if serious financial irregularities or frauds have been identified ; or

(*iii*) if there are judicial directives to this effect ; or

(*iv*) if there is perpetual lack of quorum :

Provided also that, the members of the Board of a primary agricultural credit co-operative society which has been superseded shall not be eligible to be re-elected, re-appointed, re-nominated or re-co-opted, as a member of the committee for a period of three years from the date of supersession of the Board. ";

(*b*) in sub-section (*4*),—

(*i*) before the existing proviso, the following proviso shall be inserted, namely :—

" Provided that, the committee or Administrator shall make arrangements for constitution of a new committee of co-operative credit structure entity, within a period of two months from the date of order of supersession of board of co-operative credit structure entity ; " ;

(*ii*) in the existing proviso, for the words, " Provided that " the words " Provided further that " shall be substituted ;

(*iii*) after the existing proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided also that, in no circumstances the term of office of the committee of, or the Administrator appointed on, the co-operative credit structure entity shall exceed six months from the date of supersession of the committee. ".

Amendment of section 81 of Mah. XXIV of 1961.

**23.** In section 81 of the principal Act,—

(*i*) in sub-section (*1*),—

(*a*) after sub-clause (*a*), the following proviso shall be inserted, namely :—

" Provided that, the audit of the District Central Co-operative Bank and the State Co-operative Bank shall be conducted by a Chartered Accountant approved by the National Bank ; " ;

(*b*) in sub-clause (*b*), after the existing proviso, the following proviso shall be inserted, namely :—

" Provided further that, the primary agricultural credit co-operative society shall arrange to get their accounts audited at least once in each co-operative year by an auditor from the panel of auditors maintained by the Registrar ; or by a Chartered Accountant holding a certificate in co-operative audit issued by the Institute of Chartered Accountants of India. The District Central Co-operative Bank and the State Co-operative Bank shall arrange to get their accounts audited at least once in each co-operative year through a Chartered Accountant from the panel of auditors approved by the National Bank. ";

(*ii*) after sub-section (*6*), the following sub-section shall be added, namely :—

"(7) Special audit of the Co-operative Bank if requested by the Reserve Bank of India shall be conducted and report thereof shall be submitted to the Reserve Bank of India under intimation to the Registrar alongwith the Special Audit Report.".

**24.** Section 110A of the principal Act shall be re-numbered as sub-section (*1*) thereof; and after the sub-section (*1*), so re-numbered, the following sub-section shall be inserted, namely :— Amendment of section 110A of Mah. XXIV of 1961.

"(*2*) Notwithstanding anything contained in this Act, in the case of the District Central Co-operative Bank and the State Co-operative Bank, the supersession of the Board and appointment of liquidator shall be made by the Registrar, within one month of being so advised by the Reserve Bank of India.".

**25.** In section 157 of the principal Act, after the word "societies", at both the places where it occur, the words "other than co-operative credit structure entity" shall be inserted. Amendment of section 157 of Mah. XXIV of 1961.

**26.** In section 165 of the principal Act, in sub-section (*2*), clause (*xxxii-a*) shall be deleted. Amendment of section 165 of Mah. XXIV of 1961.

Mah. Ord. VIII of 2007. **27.** (*1*) The Maharashtra Co-operative Societies (Second Amendment) (Continuance) Ordinance, 2007, is hereby repealed. Repeal of Mah. Ord. VIII of 2007 and saving.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done or taken under the principal Act, as amended by this Act.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई